**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या**

**दिनांक : १५/०६/२०१२ रोजी सायंकाळी ३.०० वाजता**

**आयोजित केलेल्या २४२ व्या बैठकीचे कार्यवृत्त**

**बाब क्रमांक : २४२/२**

**विषय :- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळासाठी उपलब्ध होणा-या गिरणीच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या तसेच मंडळाच्या इतर संक्रमण शिबीरातील गाळे वि.नि.नि.कलम ३३ (९) अंतर्गत पुनर्विकास प्रकल्पांसाठी वितरीत करण्याचे धोरण निश्चित करणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५५९** **दिनांक : १७/०४/२०१२**

उक्त विषयाबाबत प्राधिकरणासमोर सादर करण्यात आलेल्या सर्क्युलेशन पध्दतीनुसार खालील प्रमाणे ठरावास प्राधिकरण मान्यता देत आहे.

१) विकास नियंत्रण नियमावली नियम ३३(९) खालील मंजूर योजना करीता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबीरातील रिक्त गाळे पात्र विकासकास भाडेतत्वावर देण्यात

येतील. १०० पेक्षा अधिक संक्रमण गाळे विकासकास वितरण करण्यासाठी  विकास नियंत्रण नियमावली ३३(९) कलमपुरतीच अनुज्ञेय राहिल

२) ज्या विकासकाकडे विकास नियंत्रण नियमावली नियम  ३३(९) अंतर्गत पुर्नविकास प्रकल्पाकरिता बृहन्मुंबई महानगर पालिकेचे इरादा पत्र ( Letter of Intent ) आहे असा विकासक मंडळाकडे संक्रमण गाळयांची मागणी करण्यास पात्र राहील. याचाच अर्थ ज्या विकासकांकडे बृहन्मुंबई महानगर पालिकेचे इरादा पत्र ( Letter of Intent ) नाही ते विकासक मंडळाकडे गाळे मागणी करीता अर्ज करु शकणार नाहीत.

३) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने त्यांची गाळ्यांची वार्षिक सरासरी गरज लक्षात घेऊन मंडळाने दरवर्षी त्यांचेकडील एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीकरीता कमीत कमी ७०० रिक्त संक्रमण गाळे व ऑक्टोबर ते मार्च या कालावधीकरीता कमीत कमी ४०० गाळे राखीव म्हणुन ताब्यात राहतील अशा पद्धतीने वितरणाची कार्यवाही करावी.

४) पात्र विकासकाने मंडळाकडे संक्रमण गाळयांची मागणी केल्यास, पात्र भाडेकरुंचे मर्यादेत व जास्तीत जास्त १०० गाळे भाडेतत्वावर मिळण्यास तो पात्र असेल तर अशा विकासकास १०० पेक्षा जास्त गाळे मंडळातर्फे वाटप करता येणार नाहीत.

५) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची विविध  संक्रमण शिबीरे ही मुंबई शहर व मुंबई उपनगरात अशी विखुरलेली आहेत. त्यामुळे प्रस्तावित धोरणानुसार संक्रमण गाळे वितरीत करताना मुंबई शहरातील व मुंबई उपनगरातील प्रकल्पांकरीता, मुंबई उपनगर संक्रमण शिबीरांचाच विचार करण्यात यावा. तथापि एखाद्या प्रकल्पाची निकड विचारात घेता

अपवादात्मक परिस्थितीत मा.उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना सदर अटी व शर्ती शिथील करण्याचा अधिकार राहिल.

६) **प्रस्तावित मुळ भाडे व वार्षिक भाडेवाढ आकारणी तक्ता**

| **अनु क्र** | **इमारत तपशिल** | **मुंबई उपनगर** | | **मुंबई शहर** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **मुळ भाडे** | **वार्षिक वाढ (%)** | **मुळ भाडे** | **वार्षिक वाढ (%)** |
| १ | तळ + ४ मजले | ६००० | ५ % | ६००० | ५ % |
| २ | तळ + ७ मजले<br>१ उदवाहन | ७००० | ५ % | ८००० | ५ % |
| ३ | तळ + ७ पेक्षा अधिक मजले २ ते ३ उदवाहन<br>उच्च शक्तीचे पाण्याचे पंपाची जोडणी | ८००० | १० % | १०००० | १० % |

७) संक्रमण गाळे वितरीत करते वेळी एका वर्षाचे भाडे विकासकास मंडळाकडे आगाऊरित्या पे ऑडरच्या स्वरुपात भरावे लागेल. त्याव्यतिरिक्त विकासकास ३ महिन्यांचे मासिक भाडे आगाऊरित्या सुरक्षा ठेव (अनामत रक्कम) म्हणुन पे ऑडरच्या स्वरुपात मंडळाकडे जमा करावे लागेल. सदर रक्कमेचा परतावा करताना विकासकांस कोणत्याही प्रकारचे व्याज देय होणार नाही. विकासकांनी गाळे मंडळाकडे परत केल्यानंतर सुरक्षा ठेवीची रक्कम त्यांना देय असलेल्या रक्कमेतून वजा करुन परत करण्यात येईल.

८) भाडयापोटी प्राप्त झालेली रक्कम ठेवीच्या लेखाशिर्षा खाली ठेवण्यात येईल व सदर रक्कम दुरुस्ती व पुनर्रचनेच्या इतर कार्यक्रमासाठी वापरली जाणार नाही.

९) ज्या प्रकल्पासाठी संक्रमण गाळे वितरीत करण्यात आले आहेत त्याच प्रकल्पातील पात्र भाडेकरुंकरीता संक्रमण गाळ्याचा विकासकास वापर करता येईल. विकासकास त्या प्रकल्पा व्यतिरिक्त इतर प्रकल्पासाठी सदर संक्रमण गाळयाचा वापर करता येणार नाही, अथवा अन्य विकासकास / व्यक्तीस देता येणार नाही.

१०) ज्या प्रकल्पासाठी गाळे मंडळाचे आगाऊ भाडे व डिपॉझिट रक्कम घेऊन मंजुर केले आहे त्या प्रकल्पातील पात्र भाडेकरु / रहीवाशांना संक्रमण गाळयांचे जागी विकासकाचे स्वखर्चाने ३ महिन्यांचे आत स्थलांतर करावे लागेल. तीन महिन्यांचे आत तसे न झाल्यास, सदर विकासकास देण्यात आलेले गाळे वितरणाची परवानगी रद्द (Deemed to be Cancelled) झाली आहे असे गृहित धरुन वितरीत केलेले गाळे मंडळ ताब्यात घेईल. सदर गाळे वितरण व ताबा परत घेतल्याचा कालावधीकरीता भाडे आगाऊ जमा केलेल्या रक्कमेतुन कपात करुन उर्वरित रक्कम विकासकास परत करण्यात येईल. सदर संक्रमण गाळयांचे ठिकाणी होणा-या घुसखोरीस विकासकास जबाबदार धरण्यात येईल.

११) अश्या प्रकारच्या प्रस्तावांमध्ये संपूर्ण इमारत विकास नियंत्रण नियमावली ३३(९) अंतर्गत एकाच विकासकास वितरीत झाले असल्यास रु.६०००/- प्रती महा प्रती गाळा भाडे आकारण्याचे प्रस्तावित आहे. उपरोक्त तक्यामध्ये दर्शविलेली वार्षिक भाडेवाढिसह लागू राहिल. तसचे विकासकाला सर्व देखभाल खर्च, पाणी,विद्युत,मालमत्ता कर, साफ सफाई, दुरुस्ती व देखभाल, पाहारेकरी (Watch & Ward ) असे सामायिक देयके व इतर सर्व कर करांचे देयक , इत्यादि अनुषंगीक सर्व बाबी विकासकास अदाकरणे बंधनकारक राहिल. अशी सर्व देयके सर्व संबंधित देयके विकासक परस्पर भरणा करुन, भरणा केलेली सर्व देयक मंडळास सादर करणे बंधनकारक राहिल.

१२) भागांशः इमारत / गाळे वितरीत केले असल्यास उपरोक्त तक्यात नमूद केल्याप्रमाणे मूळ भाडे व वार्षिक भाडेवाढ विकासकास भरणाकरणे अनुज्ञय राहिल. अशा परिस्थितीत दुरुस्ती व देखभालीची जबाबदारी मंडळावर राहिल.

१३) विहित मुदतीनंतर, विकासकाने त्याला भाडयाने देण्यात आलेले गाळे, रिक्त करुन मंडळाकडे परत न दिल्यास, अथवा अन्य व्यक्तीस दिल्यास / घुसखोरी झाल्यास त्यांच्याकडुन प्रति गाळा रु.१२,०००/- प्रति महिना असे दंडात्मक भाडे मंडळातर्फे वसुल करण्यता येईल. तसेच त्यांचे विरुद्ध निष्कासनाची कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर गैरप्रकार विचारात घेऊन ज्या यंत्रणेचा प्रकल्प आहे त्या यंत्रणेला अशा प्रकल्पाचे काम थांबविणे, विकासकाविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करणेबाबत कळविण्यात येईल.

१४) पात्र विकासकास, त्याचा विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त ३ वर्षाच्या मुदतीसाठी यापैकी जो कमी असेल त्या कालावधीकरीता संक्रमण गाळयांचा वापर करण्याची अनुमती राहिल.

१५) पात्र विकासकास निश्चित करण्यात आलेले एक वर्षानंतरचे पुढील भाडे दर सहा महिन्यांचे आगाऊ एक रक्कमी पे ऑडरद्वारे मुख्य लेखा अधिकारी / दुवपु मंडळ यांचे अभिरक्षेत जमा करणे आवश्यक राहिल.

१६) मंडळाने वेळोवेळी सुधारित केलेल्या दराने भाडे भरणा विकासकावर बंधनकारक राहिल.

१७) विकासकासोबत सर्व कायदेशीर करारनामे नोंदणीकृत करावे लागेल.

१८) वितरणाचे आदेश निगर्मित करण्यापुर्वी विहित करारनामा, प्रतिज्ञापत्र व क्षतपुर्तीबंध पत्र विकासकाने सहमुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांचे नावे करावे. तसेच असे वितरण आदेश सहमुख्य अधिकारी / दुवपु यांच्या स्वाक्षरीने निगर्मित करावेत.

१९) संक्रमण गाळे वितरणानंतर संबंधित विकासकाने शर्त भंग केल्यास अथवा काही गैरवापर केल्यास संबंधित यंत्रणा ज्यांनी गाळे वितरणाबाबत शिफारस केली अथवा मंडळाकडे अर्ज पाठविला त्या यंत्रणेने अशा विकासकाविरुद्ध आवश्यक ती कार्यवाही करणे अपेक्षित राहिल.

२०) सहमुख्य अधिकारी अथवा मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या ना हरकत प्रमाणपत्रा शिवाय खुल्या विक्री योग्य इमारतींना भोगवटा देऊ नये अशी अट गाळे वितरण आदेशाची प्रत बृहन्मुंबई महानगर पालिकेस आवश्यकत्या कार्यवाहिकरिता अग्रेषित करावी करावी.

२१) मागणी अर्ज व प्रकरण निहाय उपलब्ध गाळयांची संख्या विचारात घेवून वि.नि.नि ३३(९) च्या पुर्नविकास प्रकल्पांच्या प्रति एकर साठी कमाल १०० संक्रमण सदनिका उपलब्धतेनुसार वितरण करण्याचे प्रकरण निहाय मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांचे मान्यतेने कार्यवाही करण्यात येईल.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायाकरण्याची वाट न पाहता अंमलबाजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक :  २४२/३**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २०१० - ११ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा, लेखापरिक्षण अहवालासह प्राधिरकणाच्या बैठकीत अवलोकनार्थ ठेवण्याबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक :  ६५६०    दिनांक :  १७/०४/२०१२**

प्राधिकरणाचा सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा लेखापरिक्षण अहवाल स्विकृत करून व त्याचे मराठीकरण करून इंग्रजी व मराठी भाषेतील छापील प्रतीसह वार्षिक लेखा इंग्रजी २५० व मराठी ७०० प्रतीत विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे सादर करण्याकरीता शासनाकडे पाठविण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**बाब क्रमांक : २४२/४**

**विषय :- वर्धा येथील सर्व सेवा संघाच्या जमिनीवरील ५०
मध्यम उत्पन्न गट योजनेच्या बांधकामाच्या
प्राप्त झालेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५६१** **दिनांक : २/०५/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,

वर्धा येथील सर्व सेवा संघ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जमिनीवर ५० एमआयजी गाळयांसाठी मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी ( सन २००९-१० दरसूचीवर ) मागविलेल्या व प्रस्तावित केलेल्या निविदांप्रमाणे मे. एस.एस.पाटील ॲन्ड कंपनी नागपूर, यांची, निविदा किंमतीपेक्षा १३.३३% जादा ( चालू दरसूची २०११-१२ नुसार १.४४% नी जादा ) असलेल्या प्रथम निम्नस्तर दर / देकाराप्रमाणे ( रु.४,४६,७०,१३१/- किंमतीची निविदा हे प्राधिकरण सर्क्युलेशन पध्दतीने स्विकारीत आहे. विषयांकित योजनेमध्ये दर्शविलेले गाळे २०१२-१३ च्या भौतिक उद्दीष्टामध्ये समाविष्ट केले असल्याने ही निविदा स्विकारुन (स्थायीकरणाची वाट न पाहता) नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना मुख्य अधिकारी नागपूर मंडळ यांना देण्यात याव्यात.

प्राधिकरणाच्या आगामी बैठकीपुढे सदर बाबत घेतलेला निर्णय प्राधिकरणास अवगत करण्यात यावा.

**बाब क्रमांक : २४२/५**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १३/०३/२०१२ रोजी झालेल्या अर्थसंकल्पीय विशेष बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत...**

---------------------

**ठराव क्रमांक : ६५६२** **दिनांक : १५/०६/२०१२**

श्री.एम.सी.दलवानी, कार्यकारी अभियंता यांचेबाबतीत त्यांचेकडून नियम ५ अ -(१) (तीन) अनुसार प्राधिकरणाच्या आर्थिक हानीची रक्कम वसूल झालेली आहे. तसेच प्रस्तूत अपिल प्रकरणी नियम २३ अनुसार अपिल पुनर्विलोकीत करुन नियम ५ अ - (१) ( सहा ) ची शिक्षा शिथील करुन नियम ५ अ -(१) (चार) अनुसार दोन वर्षाकरिता वेतनवाढी रोखण्यात येऊन श्री.दलवानी यांना उपमुख्य अभियंता या पदावरुन कार्यकारी अभियंता या पदावर देण्यात आलेली पदावनतची एक वर्षाची शिक्षा देऊन त्यांना एकवर्षानंतर उपमुख्य अभियंता या पदावर पदोन्नत करण्यासाठी पदोन्नती समितीकडे शिफारस करण्यात यावी, असा अपिल प्रकरणी निर्णय देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यात यावी.

तसेच मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळांतर्गत संक्रमण शिबिराच्या चालू व विशेष दुरूस्तीवर झालेल्या अनियमित खर्चाच्या प्रकरणांसंबंधीत उपमुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता, शाखा अभियंता अशा एकुण १९ अभियंत्यांची विभागीय चौकशी झाली. सदरच्या

विभागीय चौकशीच्या अनुषंगाने १९ अभियंत्याना बजावण्यात आलेल्या शिक्षेसंदर्भात त्यांनी प्राधिकरणासमोर अपिल अर्ज दाखल केलेले आहे. सदरहु अपिल अर्जाची सुनावणी प्राधिकरणाचे सन्माननीय सदस्य तथा मा.प्रधान सचिव / गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, आणि मा.उपाध्यक्ष / म्हाडा यांचे समोर मा.प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ यांच्या दालनात दिनांक १२/०६/२०१२ रोजी झालेल्या सुनावणीची माहिती थोडक्यात सांगितली व व चर्चेअंती प्राधिकरणाच्या बैठकीत सर्व सन्माननीय सदस्यांनी खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

**ठराव क्रमांक : ६५६३** **दिनांक : १५/०६/२०१२**

एक मताने निर्णय घेतला कीं, मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळांतर्गत संक्रमण शिबिराच्या चालू व विशेष दुरूस्तीवर झालेल्या अनियमित खर्चाच्या प्रकरणांसंबंधीत उपमुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता, शाखा अभियंता अशा एकुण १९ अभियंत्यांची विभागीय चौकशी झाली. सदरच्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने १९ अभियंत्याना बजावण्यात आलेल्या शिक्षेसंदर्भातीत दिनांक ३०/०६/२००९ च्या आदेशातील अंतिम परिच्छेदातील मुद्दा २ मधील ' कायमस्वरुपी ' शब्द वगळण्यात येत आहे व उर्वरित आदेश जसेच्या तसे राहतील, यास मंजूरी देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक :  २४२/७**

**विषय :-  मे.के.एस.संघवी आणि कं. सनदी लेखापाल ( आयकर )**

**यांचे नेमणूकीचे नुतणीकरणाबाबत.**

---------------------------

**ठराव क्रमांक : ६५६४**                    **दिनांक :  १५/०६/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,  मे.के.एस.संघवी आणि कंपनी, सनदी लेखापाल ( आयकर ) यांना म्हाडामधील आयकर विषयक कामाकरिता तसेच कायदेविषयक बाबी पूर्ण करण्याकरिता सन २०१२-२०१३ या  वर्षाकरीता पुनर्नियुक्ती करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. मे. के.एस. संघवी आणि कंपनी, सनदी लेखापाल (आयकर) यांना प्रस्तावित कामाकरीता रु. १.७५ लाख प्रतिमाह इतकी व्यावसायिक फी  अदा करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४२/८**

**विषय :- मौजा दत्तपूर व मौजा भिवापूर ता.जि. वर्धा येथील महारोगी सेवा समिती दत्तपूर यांच्या मालकीची २६.०० हे.( अंदाजे ६५ एकर ) जमीन म्हाडा ( नागपूर मंडळ ) साठी म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ५२ अंतर्गत खरेदी करणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५६५** **दिनांक : १५/०६/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, मौजा दत्तपूर व मौजा भिवापूर ता.जि. वर्धा येथील महारोगी सेवा समिती दत्तपूर यांच्या मालकीची २६.०० हे.( अंदाजे ६५ एकर ) जमीन म्हाडा ( नागपूर मंडळ ) साठी म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ५२ अंतर्गत रु. १३.०० लक्ष प्रति एकर दराने खरेदी करणेबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १३/०६/२००८ च्या बैठकीत करण्यात आलेला ठराव क्र.६२९८ रद्द करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक :  २४२/९**

**विषय :-  मौजे कोलेकल्याण,न.भू.क्र.५६११ पै.
असलेल्या मे.जय भगवती डेव्हलपर्स ॲन्ड बिल्डर्स
यांना वितरीत झालेल्या सुमारे ३२९.७५ चौ.मी.
क्षेत्रफळाचे तसेच सदर भूखंडापैकी श्री.इम्रान ए.शेख
यांना भाडेतत्वावर सुमारे १५०-० चौ.फुट क्षेत्राचे
वितरण रद्द करणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५६६**                    **दिनांक :  १५/०६/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, मौजे कोलेकल्याण न.भू.क्र.५६११ पै. असलेल्या मिळकतीवरील १५० चौ.फुटाचे लीव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर विहीत अटी व शर्तींच्या अधिन राहून वितरणापोटी अनामत रुक्कम    रु. १०००/- व मासिक भाडे रु. २००/-  आकारुन श्री.इम्रन शेख यांना दिनांक १५/०६/२००७ ते १४/०५/२००८ या एका वर्षाच्या कालावधीकरिता करण्यात आलेले वितरण कालवधी संपुष्टात आल्याने मुदतवाढ न देता  रद्द करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४२/१२**

**बाब क्रमांक : २४२/१३**

**विषय :- नाशिक मंडळाकडील मोकळया भूखंडावर गृहनिर्माण प्रकल्पाचे काम मे.बी.जी.शिर्के कं.टे.प्रा.लि.यांना टर्न की तत्वानुसार देण्याबाबत.**

----------------------------------

**ठराव क्रमांक : ६५६७** **दिनांक : १५/०६/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं,

नाशिक मंडळांतर्गत कामे कार्यादेश दिल्यापासून खाली तक्त्यात नमुद केलेली रु. १३७.६४७ कोटी रक्कमेची कामे २४ महिन्यांचे कालावधीत पूर्ण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | योजना | गाळयांची संख्या | देय जोते क्षेत्रफळचौ.फुट | बांधकाम दर प्रती चौ. फुट | निविदा किंमत [कोटीमध्ये] |
|---|---|---|---|---|---|
| १ | मध्यम उत्पन्न गट आडगाव जिल्हा नाशिक गट क्र. ६०९ | ११२ | 107111.00 | १४७८.०० | 15.831 |
| २. | अल्प उत्पन्न गट आडगाव जिल्हा नाशिक गट क्र. ६०९ | ८४ | 62771.00 | 1392.00 | 8.737 |
| ३. | अत्यल्प उत्पन्न गट आडगाव जिल्हा नाशिक गट क्र. ६०९ | १९२ | 90661.00 | १३९२.०० | 12.620 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | मध्यम उत्पन्न गट स.क्र. २१७ / ४ (अ) म्हसरूळ | ५६ | 57502.00 | १४७८.०० | 8.498 |
| ५ | मध्यम उत्पन्न गट क्र. ३१९/१-ब पाथर्डी शिवार, नाशिक | ४७ | 49170.00 | 1478.00 | 7.267 |
| ६ | मध्यम उत्पन्न गट स. क्र ३०९ [०१ ते ०४ पैकी] पाथर्डी शिवार, नाशिक | २२७ | 238203.00 | 1763.00 | 41.995 |
| ७ | मध्यम उत्पन्न गट स.क्र. ४४८ / ५ / ६ मखमलाबाद | ११२ | 109398.00 | १४७८.०० | 16.169 |
| ८ | अल्प उत्पन्न गट स.क्र. ४३ / २B / २+४३ / २B / १A/ २ पंचक | १६८ | 129537.00 | 1392.00 | 18.032 |
| ९ | मध्यम उत्पन्न गट स.क्र. २०४ / १ / २ हिरावाडी, पंचवटी | ५६ | 57502.00 | 1478.00 | 8.498 |
| | **एकूण** | **१०५४ सदनिका** | **901855.00** | | **137.647** |

१. विक्री गाळयांसाठी बांधकामाचे दर नवीन शासन निर्णयानुसार रूपये ८२४/- प्रती चौरस फुट दराने बांधकाम [लिप्टसहित] अधिक सुधारित विनिर्देशासाठी व रूपये ८०५/- प्रती चौरस फुट दराने बांधकाम [विनालिप्ट] अधिक सुधारित विनिर्देशासाठी सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे अधिक दर, अधिक भाववाढ आणि विक्रीकर या दराने बांधकाम देण्याचे प्रस्तावित आहे. शासनाच्या दिनांक १७/०९/१९९९ रोजीच्या बैठकीत कार्यवृत्तांतानुसार व दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम व विनिर्देश अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. वर नमुद केलेल्या दरानुसार केलेल्या कामाच्या किमंतीमध्ये भाववाढ किंवा घट सिमेंट व स्टील वगळून इतर बाबींच्या, जून २००४ च्या मूळ निर्देशांकानुसार म्हाडाच्या प्राईस व्हेरिएशन फॉर्म्युल्याप्रमाणे करण्यात यावी. मात्र सिमेंट व स्टीलच्या बाबतीत भाववाढ किंवा घट, काम सुरु

असताना बाजारभावाप्रमाणे दर व खालीलप्रमाणे दिलेल्या स्टाररेटमधील फरकाप्रमाणे काढण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

स्टील - ३२०००/- प्रती टन.

सिमेंट - २८२०/- प्रती टन.

३. कंत्राटाप्रमाणे देण्यात येणा-या १६ टक्के व्याजयुक्त मोबिलाईझेशन अग्रीमावर सदर अग्रीम देण्यात आलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यत व्याज आकारण्यात यावे. सदर व्याजाचा दर प्राधिकरणास मिळणा-या गुंतवणूकीच्या व्याजाच्या दराएवढा किंवा वित्त नियंत्रक / प्राधिकरण यांच्या सुचनेनुसार आकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

४. योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांचे काम जसे की सुरक्षा भिंत, पायवाटा, गटारे, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे, दिवाबत्ती इत्यादी तसेच सुविधा इमारतींची कामे जसे की चक्की, दवाखाना, सुविधा दुकाने इत्यादी कामे, कामाचे मूळ कंत्राटदार मेसर्स बी.जी.शिर्के कंपनीकडून अतिरिक्त सुविधांचे काम सुरु करताना प्रचलीत असणा-या दरसुचीवर (P.W.D. व M.J.P. D.S.R.) बी-१ करारनाम्या अंतर्गत करुन घेण्यास मंजुरी देण्याचे प्रस्तावित आहे. जे दर दरसुचीमध्ये नसतील त्यांचे विश्लेषण (Rate Analysis) करुन सक्षम अधिका-यांची मंजुरी घेण्यात यावी. तसेच सुविधा कामांच्या किमंतीमध्ये भाववाढ किंवा घट काम सुरु करताना अस्तित्वात असलेला निर्देशांक व काम सुरु असताना अस्तित्वात असलेल्या निर्देशांकाच्या फरकानुसार म्हाडाच्या प्राईस व्हेरिएशन फॉर्म्युल्याप्रमाणे देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

५. सदर कामे महानगर पालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर, मंजुर नकाशांप्रमाणे योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

६. प्राधिकरणाच्या धोरणानुसार कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी घरांची मागणी आजमाविण्यात येते. परंतु मुंबई मंडळानुसार खुल्या विक्रीच्या गाळयांची जाहिरात नमुना सदनिका तयार झाल्यानंतर देण्याचे प्रस्तावित आहे. भविष्यात सदर योजनेमुळे म्हाडास कोणत्याही प्रकारचा तोटा व नुकसान होणार असल्यास, शासनाचे दिनांक ०२/०३/२००१ चे पत्रानुसार त्याची जबाबदारी मेसर्स बी. जी. शिर्के कंपनी यांचेवर राहील व ते भरपाई करुन देतील या आशयाचे त्यांचेकडून हमीपत्र [अंडरटेकींग] घेण्यात येईल व मगच संपूर्ण बांधकाम हाती घेण्यासंबंधीचे कार्यादेश देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

७.	सदर योजनांमधील खुल्या विक्रीच्या गाळयांची जाहिरात नमुना सदनिका तयार झाल्यानंतर देण्यात यावी ,जेणेकरुन लाभार्थीकडून चांगला प्रतिसाद मिळेल करिता मंजूरी देण्यात येत आहे.

८.	नकाशांस सक्षम महानगरपालिकेची वा तत्सम प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतर काम सुरु करण्यात यावे. प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार नकाशांत आवश्यक तेथे बदल होण्याची शक्यता आहे. असे झाल्यास सदर प्रकल्प महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

९.	प्रस्तावित जमिनींवरील नियोजनासाठी नियुक्त आर्किटेक्ट यांचे करारानुसार झालेल्या कामापोटी मंडळाने अदा केलेली रक्कम व देय असलेली रक्कम मे.बी.जी. शिर्के यांनी म्हाडाला द्यावी, यास मंजूरी देण्यात येत आहे.

१०.	गृहनिर्माण विभागाने, पूर्वरचित घटकाच्या सहाय्याने बांधकाम करणा-या कंत्राटदाराच्या यादीबाबत दिनांक २०/०५/२०१२ अन्वये शासकीय निर्णय निर्गमित केला आहे.  तरी यापुढे सदर शासकीय निर्णयाच्या आधारे पुर्वरचित घटकाच्या आधारे बांधकाम करण्याबाबत उपाध्यक्ष / प्राधिकरण यांचे मंजुरीने निर्णय घेतण्यात यावा.

ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यात यावी.